# - प्रेस नोट -

दि. १९/०९/२०२६

## देवनार पोलीस ठाणे - खुन

दि.१७/०९/२०२६ रोजी १९.०० वा.च्या सुमारास फिर्यादी-नवाब अली वाहीद अली शेख, वय- ५० वर्षे, धंदा- शिलाई काम, रा.ठी. लोकशाहीर अण्णाभाऊ साठेनगर, गोवंडी, मुंबई यांचा मयत मुलगा नामे जोहेब उर्फ सोनू वय- १८ वर्षे यांस भूपेश गार्डन, एम वॉर्ड समोर, देवनार सर्कल रोड, मुंबई - ४३ येथे त्याचे मित्र अटक आरोपी क्रमांक ०१)पुरुष वय-१९ वर्षे, अटक आरोपी क्रमांक ०२)पुरुष वय-१९ वर्षे व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे सोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्यांनी आपआपसांत संगनमत करून फिर्यादींचा मुलगा सोनू यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोक्यात तसेच पाठीवर लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यास जिवे ठार मारले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १८/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. ८२८/२६, कलम १०३(१), ३(५) बीएनएस २०२३, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------